महाराष्ट्र शासन

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.co.in
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

जाक्र.शिउसं/पुणे/उमा-४०१/१२ वी प्रवेश/परिपत्रक/२०२२ /E292 दिनांक:- ०३/०६ /२०२२

0 6 JUN 2022

परिपत्रक

प्रति,

मुख्याध्यापक /प्राचार्य,

उच्च माध्यमिक विद्यालये/ कनिष्ठ महाविद्यालये (सर्व)
पुणे, अहमदनगर व सोलापूर जिल्हा

विषय:-इयत्ता १२ वी मध्ये कनिष्ठ महाविद्यालय बदलून प्रवेश देणेबाबत

संदर्भ:- १) शासन पत्र क्र.प्रवेश २०१८/प्र.क्र.३३३ (भाग-१)/एसडी-२, दि.११/८/२०२०
२) पालक व विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज

संदर्भ शासन पत्र क्र. १ अन्वये इ.१२ वी मध्ये कनिष्ठ महाविद्यालय बदलून देण्यासंदर्भात सन २०२०-२१ पासून खालील नमूद परीस्थिती मध्ये कनिष्ठ महाविद्यालयाला मंजूर जागांच्या मर्यादेमध्ये व जागा उपलब्ध असल्यास कनिष्ठ महाविद्यालय बदलून देण्याची कार्यवाही कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

१) सध्या विद्यार्थी शिक्षण घेत असलेले महाविद्यालय घरापासून लांब असणे.
२) पालकांची बदली होणे.
३) वैद्यकीय कारणास्तव राहात असलेल्या परिसरात कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळणे .
४) शाखा बदलून मिळणे
५) विद्यार्थी राहण्याचा पत्ता बदलणे.
६) इ.१२ वी मध्ये विद्यार्थ्यास बोर्ड बदलायचे असल्यास.

संदर्भीय शासन पत्रानुसार कमवि बदलण्याच्या कारणांची खातारजमा करून मंजूर जागांच्या मर्यादेमध्ये व जागा उपलब्ध असल्यास कनिष्ठ महाविद्यालय बदलून देण्यासाठीचा प्रस्ताव आपल्या अभिप्रायासह या कार्यालयाकडे सादर करावा. यासंदर्भात कोणत्याच परिस्थितीत विद्यार्थी अथवा पालकांना प्रस्तुत कार्यालयात परवानगीसाठी पाठवू नये.

सोबत संदर्भ पत्र क्र.१

(औदुंबर डोंकरडे)
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
३) मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत , पुणे-१

प्रत माहितीस्तव

शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. पुणे, अहमदनगर व सोलापूर

महाराष्ट्र शासन

क्र. प्रवेश २०१८/ प्र. क्र. ३३३ (भाग- १)/ एसडी- २
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ११ ऑगस्ट, २०२०

प्रति,
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- इयत्ता १२ वी प्रवेशाबाबत.

सदंर्भ:- आपले पत्र क्र. विद्या-ए-१/११.प्रवेश/ २०२०, दि.१०.०७.२०२०

विद्यार्थ्यांकडून दरवर्षी विविध कारणास्तव इ. १२ वी मध्ये कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळण्याबाबत मागणी होते. यासंदर्भात, सन २०२०- २१ या शैक्षणिक वर्षापासून, कनिष्ठ महाविद्यालयाला मंजूर जागांच्या मर्यादेमध्ये व जागा उपलब्ध असण्याच्या अधीनुसार, खालील कारणांसाठी इ. १२ वी करीता विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालय बदलून देण्याची कार्यवाही कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) सध्या विद्यार्थी शिक्षण घेत असलेले महाविद्यालय घरापासून लांब असणे.
२) पालकांची बदली होणे.
३) वैद्यकीय कारणास्तव राहत असलेल्या परिसरात कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळणे.
४) शाखा बदलून मिळणे.
५) विद्यार्थी राहण्याचा पत्ता बदलणे.
६) इ. १२ वी मध्ये विद्यार्थ्यास बोर्ड बदलायचे असल्यास.

तथापि, ऑनलाईन प्रवेश प्रकियेच्या डाटाबेसमध्ये, विद्यार्थ्यांनी महाविद्यालय बदलल्यानंतर आवश्यक त्या सुधारणा करुन घेण्याची कार्यवाही संबंधित महाविद्यालयांनी करणे आवश्यक राहील.

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन